शब्दांना सत्याची धार


# प्रहार

रत्नागिरी ● शुक्रवार १२ जून, २०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक २१३ ● पाने ८ ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in



माखजन–आरवली रस्त्यावर खड्ड्यांमुळे पाण्याची डबकी
पान ३



चिरा, वीट, मार्बल, ग्रॅनाईटपासून बनवले आकर्षक तुळशी वृंदावन, देव्हारे, किचन डिझाईन्स
पान ८

# ‘होर्मुझ सामुद्रधुनी’त भारतीय लक्ष्य

## ओमानजवळ ‘एमटी जलवीर’च्या इंजिन रूममध्ये आग; ‘एमटी सेतेबेलो’वरील हल्ल्याप्रकरणी भारताचा अमेरिकेकडे तीव्र निषेध

**नवी दिल्ली/मस्कत :**

पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशात वाढत्या भू-राजकीय तणावादरम्यान आंतरराष्ट्रीय सागरी मार्गावर भारतीय खलाशांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. ओमानच्या किनारपट्टीजवळ गुरुवारी एका भारतीय क्रू असलेल्या जहाजाच्या इंजिन रूममध्ये आग लागल्याची दुर्घटना घडली, तर दुसऱ्या एका घटनेत अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात ३ भारतीय नाविकांना आपला जीव गमवावा लागला आहे. गेल्या सात दिवसांत भारतीय खलाशी असलेल्या जहाजांबाबत घडलेली ही तिसरी मोठी घटना आहे.

ब्रिटीश सागरी सुरक्षा यंत्रणा ‘युनायटेड किंगडम मरीन ट्रेड ऑपरेशन्स’ आणि ओमानमधील भारतीय दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार, ओमानच्या सोहार शहरापासून २१ सागरी मैल ईशान्येला (शिनास बंदराजवळ) ‘एमटी जलवीर’ या व्यापारी जहाजाच्या इंजिन रूममध्ये अचानक आग लागली. ‘एमटी जलवीर’ हे डांबर वाहून नेणारे जहाज असून ते ‘गिनी-बिसाऊ’ देशाच्या ध्वजाखाली कार्यरत आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी सांगितले की, ओमानच्या ‘रॉयल नेव्ही’च्या



(पान २ वर)

## ८ एप्रिलचा युद्धबंदी करार संपुष्टात

### इराणचा दावा; ट्रम्प यांच्याकडून मोठ्या लष्करी कारवाईचा इशारा

**वॉशिंग्टन/तेहरान :**

अमेरिका आणि इराणमधील लष्करी तणाव कमालीचा वाढला असून, अमेरिकन सैन्याने इराणमधील अनेक महत्त्वाच्या लष्करी तळांवर नवे शक्तिशाली हवाई हल्ले केले आहेत. या हल्ल्यांमुळे दोन्ही देशांमधील ८ एप्रिल रोजी झालेला युद्धबंदी करार आता ‘पूर्णपणे अर्थहीन’ आणि संपुष्टात आल्याची घोषणा इराणने केली आहे. या नव्या संघर्षामुळे जागतिक पातळीवर आणि विशेषतः आखाती देशांमध्ये युद्धाचे ढग गडद झाले आहेत.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, कमांडर-इन-चीफ (राष्ट्रपती) डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्देशानुसार, अमेरिकन सैन्याने इराणच्या चिथावणीखोर आणि सातत्यपूर्ण आक्रमकतेला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी हे आत्मसंरक्षणात्मक हल्ले केले आहेत. या हल्ल्यांमध्ये इराणच्या दक्षिणी भागातील लष्करी तळांसह हवाई संरक्षण यंत्रणा, रडार आणि ड्रोन नियंत्रण केंद्रांना लक्ष्य करून त्यांची दळणवळण यंत्रणा कोलमडून टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. इराणने अमेरिकेचे ‘अपाचे’ हेलिकॉप्टर पाडल्याचा आरोप अमेरिकेने केला आहे, ज्याचा बदला म्हणून ही कारवाई करण्यात आली.

(पान २ वर)

## सिंधुदुर्ग आणि नाशिक जागतिक पर्यटन स्थळे म्हणून विकसित करणार!

### नीती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मांडला रोडमॅप; २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करणार




**मुंबई (प्रतिनिधी) :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून साकारत असलेल्या २०४७ च्या ‘विकसित भारत’ संकल्पनेत महाराष्ट्र आपले सर्वोच्च योगदान देण्यासाठी सज्ज आहे. देशाच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पन्नात (जीडीपी) सुमारे १४ टक्के वाटा उचलणारे महाराष्ट्र हे देशाचे प्रमुख ‘आर्थिक इंजिन’ आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच सुशिक्षित, कुशल, निरोगी आणि सक्षम नागरिक हीच राज्याची खरी ताकद असून तिच्या बळावर ‘विकसित महाराष्ट्र - २०४७’ हा भविष्याचा सर्वसमावेशक रोडमॅप तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत राज्याला २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर, २०३५ पर्यंत २ ट्रिलियन आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरची महा-अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तसेच, ‘एक राज्य, एक जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ’ या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग आणि नाशिक या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांचा जागतिक पर्यटन स्थळ म्हणून सर्वांगीण विकास केला जाणार असल्याची मोठी घोषणाही त्यांनी केली.

नवी दिल्लीतील राष्ट्रपती

(पान २ वर)

## वेचक

### नाशिक विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा विजयाचा मार्ग मोकळा

**नाशिक (प्रतिनिधी) :** नाशिक विधान परिषद निवडणुकीतील अपक्ष उमेदवारीवरून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी आपला प्रचार थांबवत निवडणुकीतून माघार घेण्याचा आणि महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. भाजप नेते व मंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री दादा भुसे आणि गीते बंधूंच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे नाशिकमध्ये महायुतीचा विजयाचा मार्ग सुकर झाला आहे.

### ‘एअर इंडिया’ दुर्घटनेला एक वर्ष पूर्ण

**नवी दिल्ली :** अहमदाबाद येथील 'एअर इंडिया एआय-१७१ या भीषण विमान दुर्घटनेला आज १२ जून रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. या पहिल्या स्मृतीदिनाच्या पूर्वसंध्येला, पीडित कुटुंबियांना मदत आणि भरपाई देण्याची प्रक्रिया एअर इंडिया आणि टाटा समूहाने वेगाने पूर्ण केली आहे.

(पान २ वर)

## मान्सून रेंगाळला ; पुढील ३ ते ४ दिवस वाटचाल संथ राहण्याचा अंदाज

**मुंबई :**

केरळमध्ये दोन दिवस उशिराने दाखल झाल्यानंतर दमदार वाटचाल करणाऱ्या मान्सूनचा वेग आता महाराष्ट्रात मंदावला आहे. गेल्या दोन दिवसांपासून मान्सूनची उत्तर सीमा कोकणातील हर्णै आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर येथेच स्थिर आहे. मान्सून पुढे सरकत नसल्यामुळे राज्यातील बहुतांश भागांत पेरण्या रखडल्या असून बळीराजा चिंतेत सापडला आहे. मात्र, आगामी ३ ते ४ दिवसांत राज्यातील इतर भागांत मान्सून पुढे सरकण्यासाठी हवामान अनुकूल असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे.



(पान २ वर)

## गुटखा माफियांवर अन्न व औषध प्रशासनाचा प्रहार!

### जिल्ह्यात ८ ठिकाणी छापे; ६ लाखांचा गुटखा व पानमसाला जप्त, ८ जणांवर कारवाई

**रत्नागिरी (वार्ताहर)**

रत्नागिरी जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याच्या अवैध विक्रीविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम राबवत ८ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत तब्बल ६ लाख १४ हजार ५५७ रुपये किमतीचा गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला असून ६ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणात एकूण ८ जणांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेमुळे गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत. जिल्ह्याच्या विविध भागांत एकाचवेळी टाकण्यात आलेल्या छाप्यांमध्ये मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेला आणि विक्रीसाठी आणलेला गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला. प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैधरित्या व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

दरम्यान, केवळ गुटखा विक्रेत्यांवरच नव्हे तर खाद्य व्यवसायिकांवरही प्रशासनाने करडी नजर ठेवली आहे. जिल्ह्यातील ६० हॉटेल्सची अचानक तपासणी करण्यात आली. या तपासणीत स्वच्छता नियमांचे तसेच अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन करणाऱ्या चार हॉटेल मालकांना तातडीने सुधारणा नोटीस बजावण्यात आली. तसेच इतर तीन प्रकरणांमध्ये तडजोड शुल्क म्हणून २४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाने जिल्ह्यातील अन्न व्यवसायिकांची व्यापक तपासणी मोहीम सुरू केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सध्या २ हजार ७५६ कायमस्वरूपी परवानाधारक व्यावसायिक असून १६ हजार ६१० नोंदणीकृत स्टॉल्स कार्यरत आहेत. या सर्वांची टप्प्याटप्प्याने तपासणी करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला

(पान २ वर)

## इथेनॉल मिश्रित पेट्रोलवरील उत्पादन शुल्क पूर्णपणे माफ

### केंद्र सरकारचा निर्णय; २२ ते ३० टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिश्रण असलेल्या इंधनाला सवलत

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

देशात इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या वापराला गती देण्यासाठी आणि कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने २२ टक्के, २५ टक्के, २७ टक्के आणि ३० टक्के इथेनॉल मिश्रण असलेल्या पेट्रोलवरील उत्पादन शुल्क पूर्णपणे




(पान २ वर)

## ‘जनगणना २०२७’ च्या तयारीत रत्नागिरी जिल्ह्याची झेप

### ८ तालुक्यांमध्ये गृहयादीचे काम शंभर टक्के पूर्ण

#### संगमेश्वर तालुक्यातील काम प्रगतीपथावर

**रत्नागिरी (वार्ताहर)**

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या हाऊस लिस्टिंग ब्लॉक (एचएलबी) अर्थात गृहयादीकरणाच्या कामात रत्नागिरी जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. जिल्ह्यातील एकूण कामापैकी तब्बल ९९.९३ टक्के काम पूर्ण झाले असून, ९ पैकी ८ तालुक्यांनी १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. केवळ संगमेश्वर तालुक्यातील दोन ब्लॉकचे काम प्रगतीपथावर असून तेही लवकरच पूर्ण होणार असल्याने जिल्हा शंभर टक्के गृहयादीकरणाचा टप्पा गाठण्याच्या उंबरठ्यावर आहे.

जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात जनगणना २०२७ साठी अत्यंत नियोजनबद्ध तयारी करण्यात आली आहे. यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने ‘एचएलओ’ मोबाईल ॲपद्वारे करण्यात येत असून, यासाठी जिल्ह्यात ३,०८५ प्रगणक आणि

(पान २ वर)

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुढील आठवड्यात महाराष्ट्र दौऱ्यावर

**मुंबई :**



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुढील आठवड्यात दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून, १९ आणि २० जून रोजी ते कोल्हापूर जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर परिसरातील महत्त्वाकांक्षी विकास आराखड्याअंतर्गत पूर्ण झालेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि अद्याप सुरू असलेल्या प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या दौऱ्यामध्ये गृहमंत्र्यांच्या हस्ते ऐतिहासिक विकासकामांचे लोकार्पण होणार असल्याने, प्रशासकीय व

(पान २ वर)

## हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेसमध्ये गोवा बनावटीचा मद्यसाठा जप्त

### आरपीएफच्या ‘ऑपरेशन सतर्क’ अंतर्गत कारवाई

**रत्नागिरी (वार्ताहर)**

रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) रत्नागिरी पोस्टने ‘ऑपरेशन सतर्क’ अंतर्गत केलेल्या कारवाईत हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेसमधून गोवा निर्मित दारूच्या तब्बल ४२१ छोट्या बाटल्या जप्त केल्या. रेल्वेतील

(पान २ वर)



## पक्षात कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप खपवून घेणार नाही!

### सुनेत्रा पवार यांचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मी अत्यंत वेगळ्या आणि आव्हानात्मक परिस्थितीत पक्षाची जबाबदारी स्वीकारली आहे. मला येणाऱ्या सर्व राजकीय परिस्थितीची पूर्ण जाणीव आहे. दादांप्रमाणे कठोर निर्णय घेणे हा जरी माझा मूळ स्वभाव नसला तरी पक्षाच्या हितासाठी मी तसे धाडसी निर्णय घेण्यास मागेपुढे पाहणार नाही. पक्षात कुणाचाही अनधिकृत हस्तक्षेप मी खपवून घेणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरुवारी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात गुरुवारी भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दिवंगत नेते अजित पवार यांच्या

(पान २ वर)

## बालमजूर ठेवल्यास १ वर्षाची कैद आणि २० हजारांचा दंड

### ‘बालकामगार मुक्त महाराष्ट्र’ करण्याचा शासनाचा निर्धार

**रत्नागिरी :**

जगभर १२ जून हा दिवस जागतिक बालकामगार विरोधी दिन म्हणून पाळला जातो. बालमजुरीची ही अनिष्ट प्रथा मुळापासून उपटून टाकून ‘बालकामगार मुक्त महाराष्ट्र’ करण्याचा निर्धार शासनाने केला आहे, अशी माहिती रत्नागिरीचे सरकारी कामगार अधिकारी पंकज धोंडीराम खांडेकर यांनी दिली आहे. या निमित्ताने त्यांनी जिल्ह्यातील नागरिकांना बालमजुरीविरुद्ध एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

**कायद्याचा बडगा: काय आहेत शिक्षेच्या तरतुदी?**

बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम, १९८६ नुसार बालमजुरी हा गंभीर फौजदारी गुन्हा आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर खालीलप्रमाणे कडक कारवाई केली जाईल: १४ वर्षांखालील बालके: हॉटेल, ढाबे, बांधकाम, फॅक्टरी किंवा घरकामासाठी १४ वर्षांखालील बालकाला कामावर ठेवण्यास पूर्णपणे बंदी आहे. नियम मोडल्यास २० हजार रुपये दंड आणि १

(पान २ वर)

## गृहिणी म्हणजे ‘राष्ट्रनिर्माता’

### कौटुंबिक योगदानाचे मूल्य दरमहा किमान ३० हजार रुपये : सुप्रीम कोर्टाचा ऐतिहासिक निर्णय

**नवी दिल्ली:**

कुटुंबात गृहिणीचे योगदान केवळ घरापुरते मर्यादित नसून राष्ट्र उभारणीत ती मोलाची भूमिका बजावते. त्यामुळे अपघातात गृहिणीचा मृत्यू झाल्यास किंवा ती दिव्यांग झाल्यास, तिने दिलेल्या कौटुंबिक काळजीचे नुकसान हा भरपाईचा एक स्वतंत्र आणि महत्त्वाचा भाग मानला जावा, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या कौटुंबिक सेवांचे मूल्य कोणत्याही परिस्थितीत किमान ३० हजार रुपये प्रति महिना असावे, असे न्यायालयाने निश्चित केले आहे.

एका मोटार अपघात विमा दाव्याच्या अपीलावर सुनावणी करताना न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. के. सिंग यांच्या खंडपीठाने हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. निकाल सुनावताना न्यायमूर्ती संजय करोल म्हणाले की, गृहिणी ही राष्ट्राच्या प्रगतीमध्ये मोठे योगदान देते. ती एक प्रकारे राष्ट्र उभारणीचेच काम करत असते. म्हणूनच, कौटुंबिक काळजीच्या नुकसानाचे मूल्य दरमहा किमान ३० हजार रुपये निश्चित करण्यात आले

(पान २ वर)

## प्रचंड वृक्षतोडीमुळे महाधनेश पक्षाचे अस्तित्व धोक्यात

### शासनाने ठोस पावले उचलण्याची निसर्गप्रेमींची मागणी

**संतोष कोत्रे (लांजा)**

‘जंगलाचा शेतकरी’ म्हणून संबोधल्या जाणाऱ्या आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या निसर्ग पर्यटनाचा चेहरा म्हणून, जिल्ह्याची प्रमुख प्रजाती म्हणून निवड करण्यात आलेल्या महाधनेश (ग्रेट इंडियन हॉर्नबिल) या दुर्मीळ पक्षाचे मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या वृक्षतोडीमुळे तालुक्यातील अस्तित्व धोक्यात आले आहे.

संपूर्ण भारतात धनेश पक्षाच्या ९ प्रकारच्या प्रजाती आढळतात. त्यापैकी तब्बल ४ प्रजाती या एकट्या रत्नागिरी जिल्ह्यात वास्तव्य करतात. साधारणपणे महाधनेश हा पक्षी ५० ते ६० वर्षे जगतो आणि आयुष्यभर एकाच जोडीदारासोबत राहतो. मोठ्या झाडांच्या ढोलीत त्याचे वास्तव्य असते. या दुर्मीळ पक्षाला ‘जंगलाचा शेतकरी’ असेही म्हणतात, कारण तो जंगलाच्या निर्मितीत मोलाची भूमिका बजावतो. महाधनेश हा फळे खाल्ल्यानंतर त्यांची विष्ठा दूरवर टाकून हे पक्षी जंगलाची पुनर्निर्मिती करतात.

काही वर्षांपूर्वी महाधनेश हा पक्षी मादी पक्षासोबत ठिकठिकाणी सर्रासपणे आढळून यायचा. त्याचे जागोजागी दर्शन व्हायचे. मात्र गेल्या काही वर्षात लांजा तालुक्यात मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू आहे. याचा फटका या दुर्मीळ पक्षाला बसला आहे. स्थानिक पातळीवर वनविभागाचे जंगलतोडीवर नियंत्रण राहिलेले नसल्याने जंगले नामशेष होत चालली असून त्यामुळे आपसूकच महाधनेशची वस्तीस्थाने देखील शिल्लक राहिलेली नाहीत. त्यामुळे अधिवासाला धोका निर्माण झाल्याने त्याचे अस्तित्व देखील धोक्यात आले आहे. जंगलतोड ही शेतकऱ्यांच्या गरजेपुरती मर्यादीत न राहता तो लाकूड व्यवसाय बनला गेल्याने महाधनेश हा दुर्मीळ पक्षी धोक्यात आला आहे.

एकीकडे शासनाने रत्नागिरी जिल्ह्यातील वन पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि संवर्धनासाठी ‘महाधनेश’ या पक्षाची जिल्ह्याची प्रमुख प्रजाती म्हणून निवड केली आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी स्थानिक निसर्गप्रेमी आणि ‘सह्याद्री संकल्प सोसायटी’ यांच्या पुढाकारातून ‘धनेशाची राई’ सारखे उपक्रम राबवले जात आहेत. तर काही महिन्यांपूर्वी वन विभागाने पुढाकार घेत ‘धनेशमित्र संमेलन’ आयोजित केले होते. त्यामध्ये महाधनेश पक्षाला रत्नागिरीच्या निसर्ग पर्यटनाचा चेहरा बनवण्यात आले आहे.

असे असताना लांजा तालुक्यात मात्र महाधनेश पक्षाचे अस्तित्व नष्ट होईल की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या गरजेपेक्षा जंगल संपत्ती हा व्यवसाय बनल्याने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे. या वृक्षतोडीमुळे महा धनेश च्या अस्तित्वावर घाला आला आहे. त्याची प्रजनन क्षमता १० टक्क्यावर आली आहे. ही धोक्याची घंटा मानली जात आहे. गिधाड पक्षापाठोपाठ महा धनेशचे अस्तित्व जंगलतोडमुळे धोक्यात आले असून शासनाने तातडीने याची दखल घेत जंगलतोडीवर निर्बंध घातले नाहीत तर दुर्मीळ



(पान २ वर)